


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : १२ वा    गुरुवार    दि. ०६ फेब्रुवारी २०२५    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# म्हणून केस गळू लागले, टक्कल पडण्याचे धक्कादायक कारण आले समोर...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास १५ गावांमध्ये अनेकांच्या डोक्यावरचे केस गळू लागले. याचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारपासून अनेक एजन्सीज त्या गावांत गेल्या. तपासण्या झाल्या. नेमके काय घडले हे कोणीही सांगायला तयार नाही. मात्र विंचूदंशावर औषध शोधणारे डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी स्वतः त्यांच्या टीमसह या भागाला भेट दिली. स्वखर्चाने या भागातील पाणी, धान्य, रक्ताचे नमुने यांची तपासणी केली. त्यातून आलेले निष्कर्ष धक्कादायक आहेत. ज्यांच्या डोक्यावरचे केस गळत आहेत, त्यांच्या शरीरात सेलेनियमचे प्रमाण दहापटींनी जास्त आढळून आले; तर शरीरातील रक्ताच्या नमुन्यात आवश्यक असणाऱ्या झिंकचे प्रमाण एकदम कमी झाल्यामुळे हा प्रकार घडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले आहे. या भागातील लोकांना पिण्याचे पाणी रोज विकत घ्यावे लागत आहे, यासारखे दुर्दैव नसल्याचे डॉ. बावस्कर म्हणाले. डॉ. बावस्कर यांनी या भागातील राख, माती, कोळसा, नदीचे, अंघोळीचे आणि पिण्याचे पाणी तपासण्यासाठी घेतले होते. मुंबईत एजीलस फडके लॅबमध्ये वेगवेगळ्या तपासण्याही त्यांनी केल्या आहेत. या भागातील जमीन खारपान पट्ट्यातील आहे. अल्कलाइन सॉइलमुळे जिप्समचे प्रमाण कमी झाले आहे. मुळात जमीन अल्कलाइन, त्यात डीएपी, फॉस्फेट अशा खतांच्या अतिवापरामुळे मातीत येणाऱ्या धान्यात झिंकचे प्रमाण वाढत नाही व ते पाण्यात विरघळून जमिनीत मुरते. रेशन दुकानात मिळणाऱ्या गव्हातदेखील सेलेनियम वाढल्याची माहिती आयसीएमआर संस्थेने लक्षात आणून दिले. ते कुठून वाढले हा प्रश्न अजूनही सुटलेला नसल्याचे डॉ. बावसकर यांचे निरीक्षण आहे. अल्कलाइन सॉइल असल्यामुळे फॉस्फेटचा वापर कमी करावा लागेल. जिप्समचा वापर वाढवावा लागेल. सेलेनियम आले कुठून हे शास्त्रीय दृष्टीने शोधावे लागेल. संपूर्ण पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी लागेल. जमिनीतून किंवा बोअरमधून वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा वापर बंद करावा लागेल. लोकांना पिण्याचे चांगले पाणी द्यावे लागेल. मी आणि माझ्या टीमने बोंदगाव, मच्छिंद्रखेड, आदी गावांत भेट दिली. जवळपासच्या १५ गावांवर याचा परिणाम झाला आहे. पाच वर्षे वयापासून ८० वर्षे वयापर्यंतच्या लोकांचे केस जात आहेत. तीन ते चार दिवसांत टक्कल पडत आहे. याचे कारण लोकांच्या शरीरात सेलेनियमचे वाढलेले आणि झिंकचे कमी झालेले प्रमाण हे मुख्य कारण आहे. त्यासाठी त्यांनी तूर, हरभरा, गहू, ज्वारी या धान्यांची तसेच केसांचीदेखील तपासणी केली. धान्यात सेलेनियम बॉर्डर लाइनवर तर झिंक एकदमच कमी आहे. माती, कोळसा व



राखेत फॉस्फरस जास्त आहे. यामुळे इथली एकूणच खानपान प्रक्रिया बिघडून गेली आहे. -डॉ. हिम्मतराव बावस्कर

सेलेनियमच्या रुग्णांच्या शरीरात प्रतिलिटर किती मायक्रोग्रॅम प्रमाण असावे याचे काही निकष आहेत. यासाठी पार्किंग एल्मर इक्विपमेंट पद्धतीनुसार तपासणी करण्यात आली होती. काही रुग्णांच्या शरीरात हे प्रमाण ५ ते ४ हजार मायक्रोग्रॅम आढळून आले आहे. हे अत्यंत गंभीर आहे. -डॉ. अविनाश फडके (अध्यक्ष, एॅजीलस फडके लॅब)

# बिबट्याचा मुक्त संचार रात्री जरा जपूनच!

## बुलढाणा शहरालगत आठ बिबट्यांचे अस्तित्व!

**जनसंचलन/बुलढाणा**

एकेकाळी पहाटे किंवा संध्याकाळी अस्वलांचे दर्शन बुलढाणेकरांसाठी सामान्य गोष्ट होती; मात्र, आता तब्बल तीन दशकांनंतर शहरात बिबट्यांचा वाढता संचार चिंता वाढवणारा ठरत आहे. शहराच्या विस्तारित भागात दररोज बिबट्याचे दर्शन होत असून, रात्रीच्या वेळी फिरणे धोकादायक ठरत आहे. गणपतीनगर, मिर्झानगर, म्हाडा कॉलनी, क्रीडा संकुल आणि आरटीओ कार्यालय परिसरात बिबट्यांचा संचार वाढला आहे. ४ आणि ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री गणपतीनगर परिसरात बिबट्याचा वावर सीसी कॅमेऱ्यात कैद झाला. या भागात वन्यप्राणी नियमित दिसत असून, ५ भागात प्रामुख्याने बिबट्याचा वावर विशेषतः रस्त्यावर भटकणाऱ्या कुत्र्यांची शिकार बिबटे सहज करत आहेत. गणपतीनगर हा अजिंठा पर्वतरांगेच्या काठावर वसलेला विस्तारलेला परिसर आहे. तसेच, हनवतखेड येथील नगरपालिकेच्या कचरा डेपोमुळे वन्यप्राण्यांना अन्न मिळते, त्यामुळे बिबट्यांचा संचार वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे लेखी अर्ज करून बिबट्याच्या बंदोबस्ताची मागणी केली असली, तरी अद्याप ठोस





कार्यवाही झालेली नाही. ५ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त पोलिस उपअधीक्षक डी. बी. तडवी यांनी वन विभागाकडे त्वरित उपाययोजनांची मागणी केली आहे. गेल्या दोन आठवड्यापूर्वीच गणेश नगर परिसरातील आयटीआय कॉलेजच्या परिसरालगत एक आजारी बिबट्याही दिसून आला होता. वन विभागाचे बचाव पथक येण्यापूर्वीच तो म्हाडा कॉलनीमागील दरीत निघून गेला होता. शहर परिसरात बिबट दिसणे नित्याचेच झाले आहे.

# दुचाकीस्वार महिलेचा अपघातात मृत्यू

**जनसंचलन/ चिखली**

रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने स्कूटीला धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना ३ फेब्रुवारीला चिखली-जालना महामार्गावर हरिओम नगरजवळ घडली. गीता अनिल सोळंकी (३८, रा. हरिओम नगर, चिखली) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. गीता सोळंकी ३ फेब्रुवारीला सायंकाळी ४ वाजता बाजारातून खरेदी करून वडिलांच्या स्कूटीवर मागे बसून आपल्या घराकडे जात होत्या. घराजवळ पोहोचल्यावर रस्ता ओलांडताना पाठीमागून भरधाव आलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाने स्कूटीला जोरदार धडक दिली.



या धडकेत त्या रस्त्यावर पडल्या आणि गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. गीता सोळंकी यांच्या निधनाने कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सासू-सासरे, आई-वडील, दीर, भाऊ आणि मोठा परिवार आहे. ४ फेब्रुवारीला त्यांच्या मूळगाव येवता येथे अंत्यसंस्कार पार पडले.

# ...हृदया हृदय पिळवटूनच गेली...

**स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी जेव्हा लतादीदींच्या आवाजातील ए मेरे वतन के लोगों, जरा आँखों में भर लों पानी! हे गाणे ऐकले, तेव्हा त्यांचे डोळे पाण्यांनी डबडबले होते. ज्यांचा शासनाने महाराष्ट्र भूषण व भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरव केला आहे, अशा जादुई आवाजाच्या धनी गानसम्राज्ञी लताजींच्या पावन चरणी श्रीकृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या लेखरुपातील श्रद्धासुमने अर्पण करीत आहोत...**

लता मंगेशकर भारतातील एक पार्श्वगायिका गायिका होत्या. त्या सर्वोत्कृष्ट भारतीय गायिकांपैकी एक होत्या. तसेच त्यांना भारतीय गानकोकिळा म्हणतात. त्या भारताच्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या ख्यातनाम गायक-गायिकांपैकी एक होत्या. हिंदी संगीतविश्वात त्यांना लता दीदी म्हणून ओळखले जाते. लतादीदींच्या कारकीर्दीची सुरूवात इ.स.१९४२मध्ये झाली. ती कारकीर्द सहा दशकांपेक्षा अधिक काळ टिकून होती. त्यांनी ९८०पेक्षा अधिक हिंदी चित्रपटांची गाणी गायली. तर २०हून अधिक प्रादेशिक भारतीय भाषांमध्ये प्रामुख्याने मराठी गायन केले आहे. त्यांचे कुटुंब संगीतासाठी प्रसिद्ध असून सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले, उषा मंगेशकर, मीना मंगेशकर आणि ख्यातनाम संगीतकार-गायक हृदयनाथ मंगेशकर ही त्यांची सख्खी भावंडे होत. लता मंगेशकरांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे मराठी नाट्यसंगीताचे प्रसिद्ध गायक होते.

लतादीदी मंगेशकरांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९२९ रोजी मध्यप्रदेश- ब्रिटिश काळात सेंट्रल इंडिया एजन्सीच्या इंदूर शहरात झाला. त्यांचे पाळण्यातले नाव हृदया होते. त्यांचे वडील पंडित दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक तसेच नाट्यकलावंत होते. लतादीदी आपल्या आई-वडिलांचे सर्वात ज्येष्ठ अपत्य होते. आशा, उषा, मीना आणि हृदयनाथ ही त्यांची लहान भावंडे आहेत. लतादीदींना संगीताचे धडे प्रथमतः आपल्या वडिलांकडूनच मिळाले. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी वडिलांच्या संगीत नाटकांमध्ये बाल-कलाकार भूमिकेने कामाची सुरूवात केली. इ.स.१९४२मध्ये त्या अवघ्या १३ वर्षांच्या होत्या, तेव्हा वडील हृदयविकाराने मृत्यू पावले. तेव्हा त्यांचे एक आप्त तसेच नवयुग चित्रपट कंपनीचे मालक- मास्टर विनायक यांनी लतादीदींच्या परिवाराची काळजी वाहिली. त्यांनी लतादीदींना गायिका आणि अभिनेत्री म्हणून कामाचा प्रारंभ करून दिला.



संपादकीय लेख

लतादीदींनी नाचू या गडे, खेळू सारे मनी हौस भारी हे सदाशिवराव नेवरेकरांनी बसवलेले गाणे वसंत जोगळेकरांच्या किती हंसा या मराठी चित्रपटासाठी गायले, पण हे गाणे चित्रपटातून वगळले गेले. मास्टर विनायकांनी त्यांना नवयुगची पहिली मंगळागौर या मराठी चित्रपटात एक छोटी भूमिका दिली. या चित्रपटात त्यांनी नटली चैत्राची नवलाई हे दादा चांदेकरांनी स्वरबद्ध केलेले गीत गायले. इ.स.१९४५मध्ये जेव्हा मास्टर विनायकांच्या कंपनी-कार्यालयाचे स्थानांतर मुंबईस झाले, तेव्हा लतादीदी मुंबईला आल्या. त्या उस्ताद अमानत अली खाँ-भेंडीबाजारवाले यांच्याकडून हिंदुस्तानी शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. त्यांनी वसंत जोगळेकरांच्या आपकी सेवा म या हिंदी चित्रपटासाठी पा लागूं कर जोरी हे गाणे गायले. दत्ता डावजेकर हे त्या गाण्याचे संगीतकार होते. लतादीदी आणि आशादीदी यांनी मास्टर विनायकांच्या पहिल्या हिंदी चित्रपटात- बडी माँमध्ये नूरजहाँ सोबत छोट्या भूमिका केल्या. त्या चित्रपटात त्यांनी माता तेरे चरणों में हे भजन गायले. मास्टर विनायकांच्या दुसऱ्या हिंदी चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळेस लतादीदींची ओळख संगीतकार वसंत देसाई यांच्याशी झाली.

इ.स.१९४७मध्ये भारताच्या फाळणीनंतर उस्ताद अमानत अलीखाँ भेंडीबाजारवाले यांनी नवनिर्मित पाकिस्तानला देशांतर केले, तेव्हा लतादीदी अमानत खाँ- देवासवाले यांच्याकडे शास्त्रोक्त संगीत शिकू लागल्या. उस्ताद बडे गुलामअली खान साहेबांचे शिष्य पंडित तुलसीदास शर्मांकडूनही त्यांना तालीम मिळाली. इ.स.१९४८मध्ये मास्टर विनायकांच्या मृत्यूनंतर संगीतकार गुलाम हैदरांनी लतादीदींना मार्गदर्शन केले. त्या काळात हिंदी चित्रपटांमध्ये नूरजहाँ, शमशाद बेगम आणि जोहराबाई-अंबालेवाली, यांच्यासारख्या अनुनासिक आणि जड आवाज असलेल्या गायिका जास्त लोकप्रिय होत्या. सुरूवातीला लतादीदी आपल्या गाण्यात तेव्हाच्या लोकप्रिय असलेल्या नूरजहाँचे अनुकरण करीत असत. परंतु नंतर त्यांनी स्वतःच्या गाण्याची एक आगळी शैली बनवली. त्या काळात हिंदी चित्रपटांतल्या गाण्यांचे गीतकार प्रामुख्याने मुस्लिम कवी असत. त्यामुळे गाण्यांच्या भावकाव्यात भरपूर उर्दू शब्द असत. एकदा सुप्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी लताजींच्या भारतीय हिंदी गाण्यातील मराठी उच्चारांसाठी तुच्छतादर्शक शेरा मारला, तेव्हा त्यांनी शफी नावाच्या मौलवींकडून उर्दू उच्चारांची अक्षरे गिरवून घेतली होती. लोकप्रिय चित्रपट महलचे आयेगा आनेवाला हे गाणे त्यांच्या कारकीर्दीला एक महत्त्वाचे वळण देणारे ठरले. या गाण्याचे संगीतकार खेमचंद प्रकाश होते, तर चित्रपटात गाणे अभिनेत्री मधुबालाने म्हटले होते. गुलाम हैदरांनी लताजींची ओळख तेव्हा शहीद या हिंदी चित्रपटावर काम करीत असलेले निर्माते शशिधर मुखर्जीशी करून दिली. मात्र मुखर्जींनी लताजींचा आवाज अतिशय बारीक असल्याच्या बहाण्याने नाकारला. तेव्हा हैदरांचे थोड्या रागात उत्तर होते, ङ्गङ्घयेणाऱ्या काळात निर्माते आणि दिग्दर्शक लताजींचे पाय धरतील आणि आपल्या चित्रपटांसाठी गाण्याची याचना करतील.ङ्गङ्घ त्यांनी लताजींना मजबूर या चित्रपटात दिल मेरा तोडा हे गाणे म्हणण्याची अमूल्य संधी दिली.

लतादीदी मंगेशकर यांनी लिहिलेल्या लेखांचा संग्रह ग्रंथाली प्रकाशनाने सन १९९५च्या आसपासच्या वर्षी प्रसिद्ध केला होता. त्याचे संपादन मधुवंती सप्रे यांनी केले होते. पुढे हे पुस्तक मिळणे कठीण झाले. तेव्हा जयश्री देसाई यांच्या पाठपुराव्यामुळे मैत्रेय प्रकाशनने मफुले वेचितास या नावाने ते पुस्तक पुनर्मुद्रित केले आहे. लतादीदींनी पहिली मंगळागौर या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. आवाजाला ईश्वरी देणगी लाभलेल्या लतादीदी मंगेशकर यांना श्वसनाचा त्रास, न्युमोनिया व कोरोनाची लागण झाल्याने त्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होत्या. अशातच लतादीदींनी दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात चिरनिद्रा घेतली. त्यांचे कुटुंबीय, मित्रमंडळी व चित्रपटसृष्टी शोकसागरात बुडाली होती. संपूर्ण भारत देशावर शोककळा पसरली. त्यांच्या जाण्याने जनता हुंदके देऊन रडली होती.

**!! लतादीदींना व त्यांच्या अविस्मरणीय स्मृतींना श्रद्धांजली अर्पूण विनम्र अभिवादन !!**

# आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रात आदिवासी स्त्रीने पुढे आले पाहिजे- नंदिनी टारपे

**जनसंचलन/बुलढाणा**

आंध आदिवासी जमातीवरील होणाऱ्या अन्यायाविरोधात लढण्यावर आंध आदिवासी महिला संघटन व चर्चा सत्र मालेगाव जि.वाशिम येथे हळदी कुंकवाच्या कार्यक्रमा निमित्य आयोजित केले होते.यावेळी आंध आदिवासी महिलांनी कुठल्याही क्षेत्रात मागे न राहत पुरुषाच्या बरोबरीने काम करावे लागेल आणि आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रात आंध आदिवासी स्त्रीने पुढे आले पाहिजे असे आवाहन अ.भा.आदिवासी विकास परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष तथा अकोला आदिवासी प्रकल्प कार्यलयच्या माझी अध्यक्ष नंदिनीताई टारपे यांनी शनिवारी १ फेब्रुवारी ज रोजी मालेगाव येथे आंध आदिवासी महिला संघटन व चर्चा सत्र या कार्यक्रमात केले.

मालेगाव अकोला फाट्यावरील मुंगसाजी नगर कॉलनीत आयोजित आंधआदिवासी महिला संघटनाच्या चर्चा सत्र या कार्यक्रमाच्या अध्यक्ष माजी उप सभापती श्रीमती सु. प्र.घोडे होत्या प्रमुख पाहुणे व मुख्य मार्गदर्शक परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष नंदिनी टारपे होत्या.तसेच ज्योती करवते,किरण लठाड,सूर्यकांता चापे,सीता धंदरे,मंगला ढगे, शशिकला करवते,वंदना लेकुरवाळे,पर्वाती लठाड,अनिता व्यवहारे,शालिनी डाकोरे प्रमुख पाहुने उपस्थिती होत्या. या कार्यक्रमासाठी वाशिम अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातील शेकडो आंध समाजाच्या महिला सहभागी झाल्या होत्या. आजही आंध आदिवासी समाज दर्या खोऱ्यात वाड्यापाड्यात वास्तव्य करणारी मूळ आदिवासी जमात आजही सर्वांकष विकासापासून कोसो दूर आहे. आदिवासींच्या विकासाच्या बहुतांश योजना कागदोपत्री दर्शविल्या जातात प्रत्यक्षात अत्यंत कमी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतात. आदिवासी जमातीमध्ये वाशीम अकोला बुलढाणा जिल्ह्यात आंध जमात मोठ्या प्रमाणात वास्तव्यात आहे. आपल्या हक्कासाठी आजवर पुरुष मंडळीत लढत होती.आता मात्र आंध जमातीतील थोड्याफार शिकलेल्या सवरलेल्या सामाजिक जाणीव असलेल्या स्त्रियांनी आदिवासी जमातीच्या प्रेरणास्थान असलेल्या राणी दुर्गावती, सोबतच राष्ट्रमाता जिजाऊ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचा आदर्श समोर ठेवून मूळ आदिवासींच्या शासकीय नोकऱ्यातील हक्काच्या जागा नकली आदिवासींनी बळकवण्याविरोधात, त्याचप्रमाणे त्या




आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढण्यासाठी या महिलांनी आंध आदिवासी महिला संघटना स्थापन करून पश्चिम विदर्भात जिल्ह्या जिल्ह्यात महिला चर्चासत्राचा धडाकाच चालविला आहे.त्या अनुषंगाने शनिवारी १फेब्रुवारी मालेगावातील मुंगसाजी नगर कॉलनीत आयोजित चर्चासत्राचा आदिवासी वरील होणाऱ्या अन्याय विरोधात एलगार पुकारण्याचा सूर होता

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दुहेरी हत्याकांडानंतर शिर्डी साई संस्थान अलर्ट मोडवर, कर्मचाऱ्यांसाठी घेतला हा मोठा निर्णय

**शिर्डी :** साईबाबांच्या शिर्डीमध्ये सोमवारी पहाटे साई संस्थांनच्या दोन कर्मचाऱ्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेनंतर साई संस्थान प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. शिर्डी साईबाबा संस्थान कर्मचारी यांच्या ड्युटी वेळेत बदल करण्यात आला आहे. आज मंगळवार पासून कर्मचाऱ्यांसाठी नवीन वेळेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. दुहेरी हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानने मोठे पाऊल उचलले आहे. संस्थान कर्मचाऱ्यांच्या पूर्वीच्या वेळेत बदल करत आता सोयीस्कर वेळेत ड्युटी करता येणार आहे. पहाटे ४ ऐवजी आता सकाळी ६ वाजता ड्युटी सुरू होणार असून नवीन वेळापत्रकाची आज पासून अंमलबजावणी होणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांनी दिली आहे. मयत संस्थान कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना सर्वतोपरी मदत करणार विमा पॉलिसीसह सगळ्या मदत मिळवून देणार असल्याचे गोरक्ष काडिलकर म्हणाले आहेत. साई संस्थानने काढलेल्या पत्रकात म्हटले आहे की, साईंच्या दर्शनासाठी



येणाऱ्या साईभक्तांना विविध सेवा सुविधा पुरविणे तसेच संस्थानमार्फत कार्यान्वित असलेल्या वैद्यकिय व इतर सेवा सुविधा पुरविण्यासाठी संस्थानचे विविध विभागांमध्ये कर्मचाऱ्यांचे वेगवेगळ्या शिफ्टमध्ये कामाचे नियोजन करण्यात आले आहे. बहुतांश कर्मचारी हे दूर गावांमधून कामावर येतात. त्यासाठी त्यांना रात्रीचा प्रवास करावा लागतो, त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे.तसेच ही अडचण लक्षात घेता, संस्थानचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे तसेच कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी प्रसादालय, मंदिर व शैक्षणिक संकुल हे विभाग वगळता इतर सर्व विभागांचे दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

१.पहिली शिफ्ट - सकाळी ६ ते दुपारी २
२. दुसरी शिफ्ट - दुपारी २ ते रात्री १०
३.तिसरी शिफ्ट - रात्री १० ते सकाळी ६
४. जनरल शिफ्ट - सकाळी १० ते सायंकाळी ६ तसेच कर्मचाऱ्यांच्या हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने नोंद ठेवण्याच्या सूचना देखील मंदिर प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

# एकीशी अफेअर दुसरीशी लग्न?



**नागपूर:** बोहल्यावर चढण्यापूर्वी लकडगंज पोलिसांनी वराला बेड्या ठोकल्याची घटना नागपुरात घडली. दिनेश पिल्लेवार (वय ३०, रा. पडोळेनगर) असे अटकेतील युवकाचे नाव आहे. तो विमा कंपनीत काम करत असल्याची माहिती आहे. मिळालेल्या अधिक माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून त्याचे २५ वर्षीय तरुणीसोबत प्रेमसंबंध आहे. लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्यावर बलात्कारही केला. दरम्यान, दिनेशचे अन्य एका तरुणीसोबत लग्न ठरले. शनिवारी (१ फेब्रुवारी) त्याचे लग्न होते. शुक्रवारी त्याच्या घरीच हळदीचा कार्यक्रम झाला. याबाबत कळताच त्याची प्रेयसी तेथे आली. तिने हळदीच्या कार्यक्रमात गोंधळ घातला. याबाबत दिनेशने नंदनवन पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. त्यानंतर त्याच्या प्रेयसीने लकडगंज पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दिनेशला अटक केली. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची दोन दिवसांसाठी पोलिस कोठडीत रवानगी केली.गिट्टीखदान पोलिसांनी सीपीडब्ल्यूडी क्वॉर्टर परिसरात सापळा रचून तडीपार गुंडाला अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून रिव्हॉल्व्हर व जिवंत काडतूस जप्त केले. मनीष ऊर्फ लक्की गुरू पिल्ले (वय २५) असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. सप्टेंबर २०२४मध्ये त्याला एक वर्षासाठी शहर व जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले होते. तडीपार असतानाही तो बंद क्वॉर्टरमध्ये राहायचा. पोलिसांना याबाबत माहिती मिळाली. सापळा रचून पोलिसांन त्याला अटक केली.कोराडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शंभूनगर येथे घरफोडी करून चोरट्याने दागिन्यांसह सुमारे दोन लाख रुपये किमतीचे साहित्य लंपास केले. जैनब शेख अमन शेख (वय ३५) या कुटुंबासह माहेरी गेल्या. संधी साधून चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडले. आलमारीतील ७० हजारांची रोख, दागिने, साउंड सिस्टीम व सीसीटीव्हीचा डीव्हीआर चोरी केला. याप्रकरणी कोराडी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला.

# २१ कोटी कमावतेय अन् साधा वॉचमन परवड नाही! सैफ हल्ल्याप्रकरणी बेबो दिग्दर्शकाच्या निशाण्यावर....

**मुंबई-** १६ जानेवारी रोजी सैफ अली खानवर त्याच्या घरात घुसून एका चोराने चाकू हल्ला केला होता. या हल्ल्यात अभिनेता गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याला तात्काळ रिक्षेतून लिलावती रुग्णालयात नेण्यात आले. हल्ल्याच्या वेळी त्याच्याकडे कोणताही ड्रायव्हर उपस्थित नव्हता असे म्हटले जात होते. मात्र या सर्व प्रकरणाबाबत लोकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते, ज्यात चोर त्यांच्या घरात अशा प्रकारे कसा घुसला आणि घरात ड्रायव्हर कसा नव्हता हे सर्व बोलले जात आहे. हे फक्त ड्रायव्हर किंवा सुरक्षिततेबद्दल नाही, तर करीना कपूर खान तिच्या पती सैफसोबत रुग्णालयात न जाण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. यासाठी अभिनेत्रीला ट्रोलही करण्यात आले. आता एका दिग्दर्शकाने घरात वॉचमन नसल्याबद्दल करीनावर निशाणा साधला आहे. त्याने म्हटले की ती २१ कोटी कमवते पण तिला साधा वॉचमन परवडत नाही. दिग्दर्शक आकाशदीप साबीर आणि त्यांची



पत्नी शीबा यांनी लेहरे रेट्रोला दिलेल्या मुलाखतीत अप्रत्यक्षपणे करीना कपूरवर निशाणा साधला आहे. तो म्हणाला की करीनाला हिरोपेक्षा कमी फी मिळते, त्यामुळेच तिला पूर्णवेळासाठी वॉचमनचा खर्च परवडत नसेल. दिग्दर्शक म्हणाले, म्हणूनच २१ कोटींची प्राइस टॅग असलेली करीना तिच्या घराबाहेर वॉचमन ठेवू शकत नाही. जर तुम्ही तिला १०० कोटी रुपये दिले असते तर कदाचित ती सुरक्षारक्षक किंवा ड्रायव्हर ठेवू शकली असती. आकाशदीपने रिक्षेचाही उल्लेख करून तिची थट्टा केली. आकाशदीपने सांगितले की तो करीनाला बऱ्याच काळापासून ओळखतो आणि त्याने करीना-सैफ अली खानला पाठिंबा देण्यासाठी टीव्ही वादविवादांमध्येही भाग घेतला आहे. करिश्मा कपूरच्या सहारा सिनेमादरम्यान दिग्दर्शक पहिल्यांदा करीनाला भेटलेला. तेव्हा ती खूप लहान होती. करीना आणि सैफ हे जोडपे समाजात खूप आदरणीय आणि प्रतिष्ठित आहे, पण माझ्याकडे त्यांच्याबद्दल दोन प्रश्नांची उत्तरे नव्हती - घराबाहेर सुरक्षा रक्षक का नव्हता? घरी ड्रायव्हर का नव्हता? आकाशदीप म्हणाला, ही ३० सीसीटीव्ही असलेली एक सुरक्षित इमारत असू शकते, पण एक सीसीटीव्ही फुटेज पुढे करुन तुम्ही काय ठरवू शळकता तोच दरोडेखोर आहेत ? ते फुटेज तुम्हाला फक्त गुन्हा सोडवण्यास मदत करू शकते, गुन्हा रोखण्यास नाही. दुसरा प्रश्न म्हणजे त्यांच्याकडे कोणीच नव्हते. रात्रीच्या वेळी ड्रायव्हरही नव्हता.फक्त दिग्दर्शकाची पत्नी शीबाने म्हटले की मुंबईतील घरांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी जागा नाही. दिग्दर्शक पुढे म्हणाले, त्यांनी खूप काही सहन केले आहे, मला वाटते की आपण त्यांना त्यातून बाहेर पडू दिले पाहिजे.

# सावधान..! कॅन्सरची ही ५ साधी लक्षणं अचानक करतात घात, ५ व्या संकेताने ओढावू शकतो....




दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिन जगभर साजरा केला जातो. कॅन्सर अर्थात कर्करोगाबद्दल जागरूकता वाढवणे आणि कर्करोगाच्या उपचारांना प्रोत्साहन देणे या संकल्पनेतून हा दिवस साजरा केला जाऊ लागला. दरवर्षी लाखो लोकांना कर्करोगामुळे आपला जीव गमवावा लागतो. कॅन्सर होण्याचे प्रमुख कारण म्हणजे आपली बदललेली जीवनशैली. जागतिक कर्करोग दिन साजरा करण्यामागचा प्रमुख उद्देश म्हणजे कॅन्सरबद्दल जागरूकता वाढविणे. तसेच, या आजाराशी लढणाऱ्या रुग्णांना नवी आशा देणे असा आहे. मात्र सामान्यतः असे दिसून येते की कर्करोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांबद्दल जागरूकतेचा अभाव आणि नियमित तपासणीसाठी हलगर्जीपणा यामुळेही हा आजार वर्षानुवर्षे शरीरात वाढत जातो, पण निदान होत नाही.

काही प्रकारचे कर्करोग त्वचारोगासारखे सहज ओळखता येतात, कारण ते डोळ्यांना दिसू शकतात आणि बायोप्सीने त्यांची खात्री केली जाऊ शकते. पण फुफ्फुस, मूत्रपिंड, स्तन, अंडाशय आणि प्रोस्टेट ग्रंथींसारखे काही कर्करोग शरीरात अनेक वर्षे विकसित होत राहतात आणि कोणतीही स्पष्ट लक्षणे न दाखवता वाढत राहतात, ज्यामुळे त्यांचे निदान आणि उपचार अधिक कठीण होतात. यावरच मार्गदर्शन म्हणून डॉ. समित पुरोहित - वरिष्ठ सल्लागार, मेडिकल ऑन्कोलॉजी ॲक्शन कॅन्सर हॉस्पिटल, दिल्ली यांनीकर्करोगाची सुरुवातीची ५ लक्षणे सांगितली आहेत जी प्रत्येकालां माहित असायला हवीत.

### अचानक वजन कमी होणे

जर कोणतेही कारण नसताना तुमचे वजन झपाट्याने कमी होत असेल आणि त्यासोबत अशक्तपणा जाणवत असेल, तर हे कर्करोगाचे महत्वाचे लक्षण असू शकते. विशेषतः पचनसंस्थेशी संबंधित कर्करोग जसे की जठर, स्वादुपिंड आणि फुफ्फुसाचा कर्करोग असल्यास अशा प्रकारची वजन घट होते. शरीरामध्ये कर्करोगाच्या पेशी वाढू लागल्यास त्या शरीरातील पोषण घटक वापरून टाकतात, त्यामुळे वजन वेगाने कमी होते. जर तुमचे अशा प्रकारे अचानक वजन कमी होत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

### शरीरात गाठी किंवा घट्टसर भाग निर्माण होणे

शरीरात कुठेही अनपेक्षित गाठ किंवा त्वचेखाली घट्टसर भाग जाणवत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. विशेषतः स्तन आणि प्रोस्टेट कर्करोगाच्या बाबतीत अशा गाठी आढळतात. या गाठी सुरुवातीला वेदनारहित असतात, त्यामुळे त्या अनेकदा लक्षात येत नाहीत. मात्र, त्या हळूहळू वाढू लागतात आणि त्याभोवती जळजळ किंवा वेदना होऊ लागतात. म्हणूनच अशा कोणत्याही बदलाची नोंद घ्या आणि त्वरित डॉक्टरांकडे तपासणी करून घ्या.

### मूत्राशयाच्या सवयींमध्ये सातत्याने बदल होणे

मूत्र किंवा मलविसर्जनाच्या सवयींमध्ये अचानक आणि सातत्याने बदल जाणवत असल्यास, त्याकडे दुर्लक्ष करू नका. सतत बद्धकोष्ठता, अतिसार, मलविसर्जन करताना वेदना किंवा रक्ताच्या धारा दिसणे, ही आतड्यांच्या कर्करोगाची लक्षणे असू शकतात. त्याचप्रमाणे वारंवार लघवी लागणे, लघवी करताना त्रास होणे किंवा रक्त दिसणे, ही मूत्राशयाच्या किंवा प्रोस्टेट कर्करोगाची लक्षणे असू शकतात. जर असे बदल सातत्याने जाणवत असतील, तर डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

न समजणारी वेदना आणि सतत थकवा येणे

सतत एखाद्या ठिकाणी वेदना राहणे आणि त्या वेळेसोबत वाढत जाणे, हे देखील कर्करोगाचे सुरुवातीचे लक्षण असू शकते. काही वेळा सांधे दुखणे, पाठदुखी किंवा स्नायूंमध्ये वेदना होत असल्यास, लोक त्याला सामान्य थकवा समजून दुर्लक्ष करतात. मात्र, वेदना जर कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय असेल आणि वेदनाशामक औषधे घेतल्यानंतरही बरी होत नसेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. त्याचप्रमाणे, कोणतेही जड काम न करता सातत्याने थकवा जाणवत असेल, तर तो शरीरात होणाऱ्या असामान्य पेशींच्या वाढीचा परिणाम असू शकतो.

### असामान्य रक्तस्त्राव किंवा स्त्राव होणे

कोणत्याही अवयवातून अनपेक्षित रक्तस्राव होत असल्यास किंवा शरीरातून असामान्य स्त्राव होत असल्यास, त्याकडे दुर्लक्ष करू नका. लघवीमध्ये रक्त दिसणे हे मूत्राशयाच्या कर्करोगाचे संकेत असू शकते. तसेच, स्तनातून अनपेक्षित स्त्राव येणे किंवा रक्त दिसणे हे स्तनाच्या कर्करोगाचे संभाव्य लक्षण आहे. मासिक पाळीव्यतिरिक्त गर्भाशयातून रक्तस्राव होणे, हे देखील गर्भाशयाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते. त्यामुळे अशा कोणत्याही बदलांची त्वरित वैद्यकीय तपासणी करून घ्या.

कर्करोगाचे निदान जितक्या लवकर होते, तितक्या उपचारांसाठी अधिक संधी उपलब्ध होतात. म्हणूनच, आपल्या शरीरातील बदलांकडे सतत लक्ष द्या आणि वेळेवर तपासणी करून घ्या. योग्य वेळी निदान आणि उपचाराने कर्करोगावर मात करणे शक्य आहे!

# खा २५ रुपयाचं हे आंबट गोड फळ, गेलेली नजर हळूहळू होईल गरुडासारखी तीक्ष्ण, नंबर होईल कमी, पोट व आतडे होईल चकाचक साफ

द्राक्षे ही चवदार आणि पौष्टिक फळांपैकी एक मानली जातात आणि ती लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतात सुद्धा! द्राक्षांचा उपयोग फळ म्हणून तर होतोच, पण त्याशिवाय ज्यूसमध्ये किंवा मनुका म्हणून आणि औषधी दृष्टिकोनातूनदेखील केला जातो. आयुर्वेदात द्राक्षांना अत्यंत गुणकारी फळ मानले आहे, जे शरीरातील उष्णता नियंत्रित ठेवण्यास, हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि पचनसंस्थेच्या कार्यक्षमतेत मदत करते. विशेषतः डोळ्यांची कमजोरी, हाडांचे आरोग्य, त्वचेचे पोषण आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यासाठी द्राक्षे अत्यंत फायदेशीर ठरतात. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत शरीराला नैसर्गिकरित्या निरोगी ठेवण्यासाठी आहारात योग्य फळांचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यासाठी द्राक्षांचे हे फायदे समजून घेणे महत्त्वाचे ठरेल. चला, पाहुया द्राक्षे खाण्याचे ५ आश्चर्यकारक आयुर्वेदिक फायदे

### डोळ्यांचे आरोग्य सुधारते

डोळ्यांच्या आरोग्यासाठी द्राक्षे अत्यंत फायदेशीर आहेत. यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि ल्यूटेन डोळ्यांच्या पेशींना पोषण देतात व मोतीबिंदू व इतर दृष्टीदोष टाळण्यास मदत करतात. सतत मोबाईल किंवा संगणकाच्या स्क्रीनसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो, अशावेळी आहारात द्राक्षे समाविष्ट केल्यास डोळ्यांची कोरडेपणा, दृष्टी कमजोर होणे यासारख्या समस्या टाळता येऊ शकतात. आयुर्वेदानुसार द्राक्षांमध्ये असलेले गुणधर्म रक्ताभिसरण सुधारून डोळ्यांना अधिक स्पष्ट आणि तेजस्वी बनवतात.

### शरीर डिटॉक्स करण्यास मदत

शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यासाठी आणि यकृत निरोगी ठेवण्यासाठी द्राक्षांचा आहारात समावेश करावा. आयुर्वेदानुसार, द्राक्षे हे नैसर्गिक डिटॉक्सिफायर म्हणून कार्य करतात. त्यामध्ये भरपूर प्रमाणात पाणी आणि फायबर असते, जे शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकण्यास मदत करते. दररोज द्राक्षे खाल्ल्यास शरीरातील रक्त शुद्ध होते, त्वचेवर नैसर्गिक चमक येते आणि पचनसंस्था सुधारते.

### हृदयाचे आरोग्य सुधारते

द्राक्षांमध्ये पॉलीफेनॉल्स आणि फ्लॅवोनॉइड्स यांसारखे घटक आढळतात, जे हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यास मदत करतात. उच्च रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलच्या समस्या टाळण्यासाठी द्राक्षे फायदेशीर मानली जातात. द्राक्षांमध्ये असलेले नैसर्गिक घटक रक्तवाहिन्या मोकळ्या ठेवण्यास आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यास मदत करतात. नियमित द्राक्षे खाल्ल्याने रक्तातील चांगल्या कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते आणि हृदय मजबूत राहते.

### हाडे मजबूत होतात

हाडे बळकट राहण्यासाठी द्राक्षे खाणे उपयुक्त ठरते. त्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन असते, जे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहे. वाढत्या वयानुसार हाडे कमजोर होऊ लागतात, त्यामुळे ऑस्टिओपोरोसिस आणि सांधेदुखी यांसारख्या समस्यांचा धोका वाढतो. आयुर्वेदानुसार, नियमितपणे द्राक्षांचा आहारात समावेश केल्यास हाडांचे आरोग्य सुधारते आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो.

### पचनसंस्था मजबूत राहते

द्राक्षे ही पचनक्रियेस मदत करणाऱ्या नैसर्गिक फळांपैकी एक आहेत. त्यामध्ये असलेले फायबर आणि नैसर्गिक साखर आतड्यांच्या हालचाली सुरळीत ठेवतात, त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते. द्राक्षांमध्ये असलेले पाचक एन्झाइम्स अन्नाचे योग्य प्रकारे पचन होण्यासाठी मदत करतात. आयुर्वेदानुसार, द्राक्षांचे सेवन केल्याने पचनसंस्था सुधारते, अन्न नीट पचते आणि अपचन, गॅस यांसारख्या समस्या दूर होतात.

द्राक्षे केवळ स्वादिष्ट फळ नसून त्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. डोळ्यांचे आरोग्य सुधारण्यापासून ते शरीर डिटॉक्स करण्यापर्यंत, हृदय व हाडांचे आरोग्य राखण्यापासून ते पचनसंस्था सुधारण्यापर्यंत, द्राक्षे खाण्याचे फायदे असंख्य आहेत. आयुर्वेदानुसार, दैनंदिन आहारात द्राक्षांचा समावेश केल्यास आरोग्य चांगले राहते आणि विविध शारीरिक तक्रारी दूर होतात. त्यामुळे तुमच्या आहारात द्राक्षांचा नक्की समावेश करा.

# लेकीसह नातवाला साखळदंडाने बांधलं, २ महिने डांबून ठेवलं; जालन्यातील खळबळजनक घटना...

**जालना:** पायात साखळदंड बांधून दोन महिने घरात कोंडून ठेवलेल्या विवाहितेची भोकरदन पोलिसांनी शहरालगतच्या आलापुर भागातून सुटका केली आहे. तिला छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठ मार्फत तिच्या पतीच्या स्वाधीन करण्यात आलं आहे. भोकरदन शहरालगत असलेल्या आलापुर येथील खालिद शहा सिकंदर शहा यांची मुलगी शहनाज उर्फ सोनल ही छत्रपती संभाजीनगर येथे आपल्या कुटुंबासोबत राहत होती. मिसाळवाडीमध्ये राहत असताना तेथील सागर संजय ढगे या मुलासोबत तिने आंतरधर्मीय विवाह केला. यानंतर शहा कुटुंबीय आलापुर येथे परत आपल्या मूळ गावी आले. या विवाह संबंधातून शहनाजला तीन वर्षाचा कार्तिक नावाचा मुलगाही आहे.साधारणतः दोन महिन्यांपूर्वी शहनाजच्या मोठ्या बहिणीची प्रसूती झाल्याने तिचे बाळ बघण्याच्या कारणाने तिच्या आईने तिला आणि तिचा पती सागर यांना आलापूर येथे बोलावून घेतले. ते या ठिकाणी आले असता शहनाज आणि तिचा मुलगा कार्तिक यांना तिच्या आई-वडिलांनी घरात ठेवून घेतले आणि पती सागर याला घरातून हाकलून दिले. यानंतर ७ डिसेंबर रोजी सागर पुन्हा त्याच्या पत्नीला घेण्यासाठी गेला असता तुझा आणि आमचा धर्म वेगळा असून आम्ही शहनाजचे आमच्या धर्मात पुन्हा दुसरे लग्न लावून देणार आहोत, असे म्हणत सागर याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन त्याला हाकलून देण्यात आले.मात्र, यानंतर २४ डिसेंबर रोजी शहनाजच्या बहिणीने सागर याला फोन करून सांगितले की शहनाज आणि तिच्या मुलाला तिच्या आई-वडिलांनी जबरदस्तीने घरात डांबून ठेवले असून त्यांच्या जीविताला धोका आहे. त्यामुळे सागर याने अखेर उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात धाव घेऊन त्याच्या पत्नीची व मुलाची सुटका करण्याची विनंती केली. त्यामुळे उच्च न्यायालयाने भोकरदन पोलिसांना आदेश दिले की, शहनाज व तिचा मुलगा कार्तिक यांची सुटका करावी. त्यानुसार, पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी उपनिरीक्षक बी. टी. सहाने व महिला कर्मचारी सीमा देठे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली ते आलापूर येथील खालेद शहा यांच्या घरी गेले. मात्र, त्यांना शहनाजच्या आईने कोणताही थारा लागू दिला नाही. यानंतर त्यांनी गोपनीय माहिती मिळवून थेट घरामध्ये घुसून शहनाज व कार्तिक यांना ताब्यात घेतले.या प्रकरणाची भोकरदन पोलिसांना मुळात कल्पना नव्हती. मात्र, उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेऊन आदेश दिल्याने हे प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात आले. मात्र, खालिद शहा यांच्या कुटुंबाचा फारसा कोणाशी संबंध नसल्याने व ते मनोरुग्ण असल्यासारखे वागत असल्याने या कुटुंबाविषयी अथवा शहनाज विषयी कोणतीही माहिती उपलब्ध होत नव्हती. मात्र, गोपनीय पद्धतीने माहिती जमा करून पोलिसांनी शेवटी काहीशा संघर्षाला तोंड देत शहनाज व कार्तिक यांची सुटका केली.

## लेकासाठी शाहरुख खानची जोरदार बॅटिंग! ...



**मुंबई :** बॉलिवूडमध्ये सध्या अनेक स्टारकिड्सनी एन्ट्री घेतली आहे. या चर्चेच्या पार्श्वभूमीवर शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान मात्र अभिनयाच्या वाटेने न जाता थेट दिग्दर्शनात पदार्पण करतोय!रोमान्सचा बादशाह शाहरुख खानचा मुलगा या सीरिजच्या माध्यमातून दिग्दर्शक म्हणून काय कमाल दाखवेल, याकडे संपूर्ण इंडस्ट्रीचं लक्ष लागले आहे. नेटफ्लिक्सच्या भव्य इव्हेंटमध्ये जेव्हा शाहरुख स्टेजवर आला, तेव्हा प्रेक्षकांमध्ये जल्लोष सुरू झाला. आणि मग, नेहमीच्या आपल्या अंदाजात त्याने घोषणा केली ङ्गमाझ्या मुलाने दिग्दर्शनात पहिलं पाऊल टाकलंय! शाहरुखच्या या घोषणेनं चाहत्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. नेटफ्लिक्सने मुंबईत आयोजित केलेल्या ङ्गनेक्स्ट ऑन नेटफ्लिक्सफ या कार्यक्रमात आर्यनच्या पहिल्या प्रोजेक्टची अधिकृत घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमात शाहरुख अचानक पोहोचला आणि चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला. लाँच इव्हेंटमध्ये शाहरुखने सांगितले की, आर्यन आपली दिग्दर्शनाची इनिंग सुरू करत आहे. त्याने आपल्या पहिल्या प्रोजेक्टचे नाव असल्याचे जाहीर केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये शाहरुखने हे शीर्षक कसे उच्चारावे हेही सांगितले.आर्यनच्या या वेब सीरीजविषयी गेल्या काही महिन्यांपासून अनेक अंदाज लावले जात होते. अखेर, या इव्हेंटमध्ये त्याच्या पहिल्या प्रोजेक्टची अधिकृत घोषणा करण्यात आली. ही बॉलिवूडच्या दुनियेतील एका बाहेरच्या माणसाच्या संघर्षावर आधारित आहे.ही एक सहा एपिसोड्सची सीरीज असून, यात सलमान खान, रणबीर कपूर, बादशाह आणि बॉबी देओल यांचे कॅमिओ रोल असणार असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, शाहरुख खानही यात झळकण्याची शक्यता आहे. इव्हेंटमध्ये या सीरीजचा पहिला टीझर सादर करण्यात आला. आर्यनने मागील वर्षी मे महिन्यात या सीरीजचं शूटिंग पूर्ण केलं होतं. आता त्याच्या रिलीजची उत्सुकता अजूनच वाढली आहे.कार्यक्रमाच्या शेवटी शाहरुखने आपल्या चाहत्यांसाठी एक खास संदेश दिला ङ्गमी जितकं प्रेम प्रेक्षकांकडून मिळवलं, त्याचं निम्मं जरी माझ्या मुलांना मिळालं, तरी ते खूप आहे. यानंतर शाहरुखने सांगितले की, त्याने या सीरीजचे काही एपिसोड्स पाहिले आहेत आणि त्याला त्यातील कंटेंट खूप आवडला.आर्यन नेहमीच कॅमेऱ्यापासून दूर राहिला आहे. अभिनयापेक्षा दिग्दर्शन आणि लेखनात रस असलेल्या आर्यनने आपल्या पहिल्याच वेब सीरीजमधून एक वेगळी कहाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ही वेब सीरीज २०२५ च्या पहिल्या तिमाहीत नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. चाहत्यांना आता याची रिलीज डेट कधी जाहीर होईल याची प्रतीक्षा आहे.

## खड्डेमुक्त, प्रदुषणमुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त मुंबई महापालिकेचा संकल्प

### पालकमंत्री शिंदेंनी सांगितला विकास प्लॅन



**मुंबई :** देशातील सर्वात मोठी महानगरपालिका म्हणवल्या जाणाऱ्या मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प आज सादर झाला आहे. ७४ हजार ४२७ कोटीचा अर्थसंकल्प मुंबई महापालिका आयुक्तांनी सादर केला आहे. आतापर्यंतचा हा सर्वात मोठ्या तरतुदीचा अर्थसंकल्प आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा या अर्थसंकल्पात १४.१९ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. आरोग्य सुविधा ते देशातील मोठे थीम पार्कसाठी हजारो कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबईकरांचे अपेक्षा या अर्थसंकल्पात प्रतिबिंबित होत असल्याचे, पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी अधोरेखित केले आहे. तर उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकाभिमुख आणि जनतेला दिलासा देणारा हा अर्थसंकल्प असल्याचे नमूद केले आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, लोकाभिमुख, जनतेला दिलासा देणारा आणि विकसित भारताकडे वाटचाल करणारा असा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे जो मंजूर देखील केला आहे. कोणतीही करवाढ, दरवाढ मुक्त आणि भुर्दंडमुक्त असा हा अर्थसंकल्प आहे. मुंबई वेगाने कात टाकत आहे, विकासाकडे वाटचाल करत आहे.एकनाथ शिंदेंनी विरोधकांवर देखील निशाणा साधला. ते म्हणाले, विरोधकांना टीका करण्याशिवाय काही काम उरलेले नाही. भ्रष्टाचारमुक्त झाल्याने महापालिकेच्या उत्पन्नात ७ हजार कोटींची वाढ झाली आहे. म्हणूनच हे लोक मुंबईला सोन्याची अंडी कोंबडी समजत होते त्यांना आता महापालिकेचा कसा विकास होतो, हे अडीच वर्षांमध्ये दाखवून दिलं आहे.

तसेच शिंदेंनी असेही नमूद केले की, खड्डेमुक्त, प्रदुषणमुक्त आणि भ्रष्टाचारमुक्त मुंबई होणार आहे. विकासकामांवर एवढा मोठा खर्च करणारी मुंबई महापालिका पहिली महापालिका आहे, सर्व घटकांना दिलासा देणारा बजेट आहे. केएम हॉस्पिटलमध्ये आयुष्मान शताब्दी टॉवर आपण उभा करत आहोत. तर झिरो प्रिस्क्रीप्शन म्हणजेच मोफत औषध वाटप होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहेत, याचं एक ड्राइव्ह आपण घेणार आहोत.तर पंतप्रधानांनी सांगितल्याप्रमाणे मुंबई फिनटेक हब होण्याच्या दृष्टीने वाटचाल करत आहे. मुंबईला ३०० एकरचं सेंट्रल पार्क आपण देणार आहोत. यामध्ये १२० एकर जागा महालक्ष्मी रेसकोर्सची घेतली आहे आणि १७५ जागा ही कोस्टल हायवेची आहे. सबवे ने हे गार्डन जोडलं जाणार आहे. तसेच लंडनच्या धर्तीवर मुंबई आय मिळणार आहे. तर विकासाला चालना मुंबई महापालिका सज्ज आहे, असेही एकनाथ शिंदेंनी सांगितले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# करण जोहर घेऊन येतोय स्टारकिड्सचा आणखी एक सिनेमा!....



**मुंबई :** नव्या कलाकारांना पाहायला प्रेक्षक नेहमीच उत्सुक असतात, आणि जेव्हा जोडी सुंदर आणि केमिस्ट्री दमदार असते, तेव्हा ती हिट होणारच! सध्या सैफचा मुलगा इब्राहिम आणि श्रीदेवी यांची मुलगी खुशी यांच्या केमिस्ट्रीची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांच्या नादानियां चित्रपटाचे गाणे इश्क में रिलीज होताच चाहत्यांनी त्यांना आधीच ङ्गपरफेक्ट जोडीफ घोषित केले आहे! इब्राहिमला पाहून लोक त्याची तुलना सैफ अली खानच्या तरुणपणाशी करत आहेत, तर खुशीच्या गॉर्जियस स्टाइलची जोरदार चर्चा सुरू आहे. नेटफ्लिक्सच्या नेक्स्ट ऑन नेटफ्लिक्स इव्हेंटमध्ये हे गाणे रिलीज करण्यात आले. गाण्यात इब्राहिम आणि खुशीची केमिस्ट्री इतकी अप्रतिम आहे की, सोशल मीडियावर चाहते त्यांचं कौतुक करण्यात व्यग्र आहेत. इब्राहिमचा लुक पाहून लोक त्याची तुलना तरुण सैफ सोबत करत आहेत,खुशी कपूरच्या अभिनयाची आणि तिच्या स्क्रीन प्रेझेन्सचीही मोठ्या प्रमाणावर प्रशंसा होत आहे. इश्क में हे गाणे प्रेम आणि मैत्रीच्या भावना दर्शवते. हे गाणे प्रसिद्ध संगीतकार जोडी सचिन-जिगर यांनी कंपोझ केले असून, त्याचे बोल अमिताभ भट्टाचार्य यांनी लिहिले आहेत. गाण्याला सचेत टंडन आणि असीस कौर यांच्या सुरेल आवाजाची जादू मिळाली आहे, जी गाण्याला अधिक भावनिक आणि रोमँटिक बनवते. नेटफ्लिक्सच्या नेक्स्ट ऑन नेटफ्लिक्स इव्हेंटमध्ये इब्राहिम आणि खुशी यांनी इश्क में वर जबरदस्त डान्स परफॉर्मन्स दिला, ज्याने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.या चित्रपटाच्या निमित्ताने इब्राहिम अली खान आपला बॉलिवूड डेब्यू करत आहे. याबद्दल उत्साह व्यक्त करत तो म्हणाला, ङ्गङ्घङ्घनादानियांफ सोबत माझे स्वप्न पूर्ण झाले आहे. मोठ्या पडद्यावर स्वतःला पाहणे आणि या प्रवासाचा भाग होणं माझ्या साठी खूप खास आहे. जेव्हा मी पहिल्यांदा हे गाणं ऐकलं, तेव्हा मी खूप खुश झालो. स्वतःच्या पहिल्या चित्रपटाचं गाणं ऐकण्याचा आनंद काही वेगळाच असतो. नादानियां लव्ह स्टोरी आणि मस्तीचा परफेक्ट मिक्स आहे, ज्यामध्ये रोमँटिक क्षणांसोबतच हलकेफुलके आणि मजेदार प्रसंगही पाहायला मिळणार आहेत. चित्रपटाची कथा पिया (खुशी कपूर) आणि अर्जुन (इब्राहिम अली खान) यांच्याभोवती फिरते. पिया साऊथ दिल्लीची बिनधास्त मुलगी आहे, तर अर्जुन नोएडामधील एक साधा, मध्यमवर्गीय मुलगा आहे. स्वभावाने वेगळ्या असणाऱ्या या दोघांच्या प्रेमाचा प्रवास कसा सुरु होतो आणि पुढे काय होतं हे उत्सुकता निर्माण करणारं आहे .सुनील शेट्टी, दिया मिर्झा, जुगल हंसराज आणि महिमा चौधरी यांच्याही या चित्रपटात महत्वाच्या भूमिका असणार आहेत. हा चित्रपट शॉना गौतम यांनी दिग्दर्शित केला आहे. करण जोहर, अपूर्व मेहता आणि सोमेन मिश्रा या चित्रपटाचे प्रोड्यूसर आहेत. लवकरच हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल.

# नागपूर मैदान रेकॉर्डब्रेक कामगिरीसाठी सज्ज, किंग कोहलीच्या रडारवर गॉड ऑफ क्रिकेटचा विक्रम....

**मुंबई:** भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली सध्या वाईट फॉर्ममधून जात आहे. त्याच्या बॅटमधून धावा काढणे कठीण झाले आहे, परंतु इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत तो बॅटने भरपूर धावा काढताना दिसण्याची अपेक्षा आहे. ६ फेब्रुवारी रोजी नागपूरमध्ये होणाऱ्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीकडे मोठी संधी आहे. क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरांचा मोठा विक्रम मोडून कोहली एक नवा इतिहास लिहिण्याच्या प्रयत्नात असेल. विराट कोहली कोणत्या विक्रमाने सचिनला मागे टाकेल ते जाणून घ्या.

विराट कोहली करणार मोठा विक्रम

जेव्हा जेव्हा विराट कोहली क्रीजवर सेट होताना दिसतो तेव्हा काही ना काही विक्रम नक्कीच मोडला जातो. यावेळी इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीकडून असेच काहीसे होण्याची अपेक्षा आहे. नागपूरच्या व्हीसीए स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीला ९४ धावांची आवश्यकता आहे. जर कोहलीने या धावा केल्या तर तो सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडेल.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १४ हजार धावा करण्याचा हा विक्रम आहे. सचिन तेंडुलकरने २००६ मध्ये पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावून आपला ३५० वा एकदिवसीय डाव खेळताना १४,००० एकदिवसीय धावा पूर्ण केल्या. तथापि, डीएलएस अंतर्गत त्या सामन्यात भारताला पाकिस्तानविरुद्ध




पराभव स्वीकारावा लागला. आता विराट कोहलीची नजर सचिन तेंडुलकरच्या १९ वर्ष जुन्या विक्रमावर आहे. विराट कोहलीने आतापर्यंत २८३ एकदिवसीय डावांमध्ये १३९०६ धावा केल्या आहेत.

या काळात विरायच्या नावावर ५० शतके आणि ७२ अर्धशतके आहेत. त्याचा स्ट्राईक रेट ९३ आहे. गेल्या वर्षी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत कोहलीने तीन सामन्यांमध्ये १९ च्या सरासरीने फक्त ५८ धावा केल्या. २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या विश्वचषक फायनलनंतर कोहलीने फक्त तीन एकदिवसीय सामने खेळले आहेत. आता इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत ९४ धावा करून विराटला सचिनला मागे टाकण्याची संधी आहे. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १४ हजार धावा करण्याच्या बाबतीत सचिन तेंडुलकर अव्वल स्थानावर आहे. त्याच्यानंतर, कुमार संगकाराने २०१५ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३८७ डाव खेळून ही कामगिरी केली.

# मेहकर जि बुलडाणा येथे शिवसेना (उबाठा) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न




**मेहकर:** मेहकर जि. बुलडाणा येथे दिनांक ५/२/२५ रोजी बुलडाणा, चिखली, सिंदखेड राजा , मेहकर या विधासभा क्षेत्रातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपर्क प्रमुख प्रा श्री नरेंद्र खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शिवसेनेचे उपनेते आ श्री नितीन बापु देशमुख आ श्री सिद्धार्थ खरात यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

याप्रसंगी आमदार श्री नितीन बापू देशमुख यांची उपनेते पदी निवड झाल्याबद्दल तसेच मेहकर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार श्री सिद्धार्थ खरात यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीला सह संपर्क प्रमुख श्री छगन दादा मेहेत्रे, जिल्हा प्रमुख श्री जालिंदर बुधवत, जिल्हा संघटक डॉ गोपाल बच्छिरे, जिल्हा समन्वयक श्री संदिप दादा शेळके, म आ जिल्हा संघटक सौ विजयाताई खडसन, सौ जिजाताई राठोड, युवासेना जिल्हा प्रमुख श्री नंदु कऱ्हाडे, उप जिल्हा प्रमुख प्रा श्री आशिष रहाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्ष संघटन मजबूत करणे, सदस्य नोंदणी करणे शाखा स्थापन करणे इत्यादी विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीला शिवसेना, महिला आघाडी, युवासेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे सहसंपर्क प्रमुख, जिल्हा प्रमुख, उप जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख यांचेसह शिवेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# जिल्हा रुग्णालयात जागतिक कर्करोग दिवस साजरा...

**जनसंचलन/बुलडाणा**

जागतिक आरोग्य संघटनेमार्फत दि. ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्यादिनाचे औचित्त साधुन आरोग्य विभागाकडुन राज्यभर राबवल्या जाणाऱ्या कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेचे जिल्हा स्तरीय उद्घाटन आमदार संजय गायकवाड यांचे हस्ते संपन्न झाले. कर्करोगाबाबत जनजागृती निर्माण व्हावी व ह्या रोगाच्या प्राथमिक अवस्थेत त्याचे निदान होवून योग्य वेळी उपचार व्हावे, हा त्यामागचा प्रमुख हेतू आहे. ह्यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे मफ या थीमसह जागतिक कर्करोग दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या संकल्पनेतून जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून कर्करोग निदान व जनजागृती मोहीममफ राज्यभरात आयोजित करण्यात आले आहेत. या मोहिमेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते दि. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी उद्घाटन करण्यात आले. राज्यस्तरावरील मोहिमेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे थेट प्रसारण जिल्हास्तरावर आयोजित उद्घाटन कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रणजीत मंडाले, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते, इंडीयन डेंटल असोसियशनचे जिल्हा अध्यक्ष डॉ. जतकर व जिल्हा सचिव डॉ.गवई आदी उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी आमदार संजय गायकवाड यांनी शासनाच्या विविध योजनाची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्यस्तरावर वेळोवेळी पाठपुरवठा करण्यात येईल, असे सर्व उपस्थितांना आश्वासित केले. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.रणजीत मंडाले ह्यांनी ङ्कक्ककर्करोग निदान व जनजागृती मोहीममफ तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाबाबत विस्तृत प्रस्तावना उपस्थितांना विषद केली. तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील यांनी गर्भाशय मुख कर्करोगाबाबत प्राथमिक अवस्थेत निदानाच्या विविध पद्धतीचा उपयोग शासकीय यंत्रणेत कसा करावा, ह्या बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान जिल्ह्यातील कर्करोग तज्ञ डॉ. निखील नलावडे, ह्रदयरोग तज्ञ डॉ. दीपक लद्धड, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मगर यांचा कर्करोग क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. जिल्हास्तरीय उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज राठोड ह्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी, मुख्य अधिपरिचारिका, परिचारिका जिल्हा परिचर्या प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या, प्राध्यापक व विद्यार्थिनी, नागरिक उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागाचे पुरस्कार १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज मागविले

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय विभागामार्फत समाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व स्वंयसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी पुरस्कार देवुन गौरविण्यात येतात. त्याअनुषंगाने इच्छुक व पात्रताधारक व्यक्ती व संस्थानी दि. १५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन समाजकल्याण कार्यालयाचे सहायक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू,फुले,आंबेडकर पारितोषिक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सन्मानपुर्वक गौरविण्यात येतो. याबाबत शासनाने सन २०२३-२४ वर्षासाठी दि.०१ फेब्रुवारी रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने पात्र व्यक्ती, संस्था यांनी सहा पुरस्कारांचे अर्ज प्राप्त चेकलिस्टनुसार प्रस्ताव तयार करुन तीन प्रतीमध्ये सहायक आयुक्त, समाज कल्याण, बुलडाणा यांचे कार्यालयात विहित मुदतीत सादर करावेत. सदर अर्ज शासनाचे संकेतस्थळ https //sjsa.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत. तसेच पात्रतेचे निकष, अटी, शर्ती संदर्भातील माहिती सहायक आयुक्त,समाज कल्याण कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बोलेरो गाडी जप्त केली म्हणून त्याने चक्क कार्यालयात लावली आग !



**जनसंचलन/मेहकर**

मेहकर येथील एका फायनान्स कंपनीचे हप्ते थकल्याने कर्जदाराची बोलेरो गाडी जप्त केली असता, पित्त खळलेल्या कर्जदाराने चक्क फायनान्स कंपनीच्या कार्यालयात पेट्रोल टाकून आग लावून कागदपत्रे जळली तसेच कंपनीच्या कर्मचाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार ४ जानेवारीला समोर आला आहे. कार्यालयातील कागदपत्रे व इतर साहित्य मिळून ६,००,००० रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. प्राप्त माहिती नुसार, मेहकर येथे डोणगाव रोडवर रहाटे कॉम्प्लेक्स मध्ये चोला मंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी आहे.आरोपी शुभम गणेश हिवरकर २७ रा. गुंदेफळ तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा याने चोलामंडलम फायनान्स कंपनीकडून सप्टेंबर २०२३ मध्ये ९,४६,००० रुपयांची वाहन कर्ज घेतले होते. मात्र आरोपी शुभम कडून सदर कर्जाचे हप्ते वेळेवर भरल्या गेले नाही.त्यामुळे कंपनीने आरोपीची एमएच २८ बीबी ६७२० क्रमांकाची बोलेरो पिकप गाडी जप्त केली.त्यामुळे आरोपी शुभम ने कंपनीच्या शाखा कार्यालयात जाऊन कंपनीच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून लोटपोट केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली आणि जवळ असलेल्या कॅन मधील पेट्रोल कार्यालयात टाकून आग लावून दिली.लागलेल्या आधीच कार्यालयातील महत्वाच्या फाइल्स व कागदपत्रे आणि इतर साहित्य असे अंदाजे ६,००,००० रुपयांचे नुकसान झाल्याचे कंपनीने दिलेल्या पोलीस तक्रारीत म्हटले आहे.याप्रकरणी मेहकर पोलिसांनी आरोपी विरुद्ध अप नंबर ७८ /२०२५ कलम ३२६ (),३२४ (५), ११५ (२), ३५२, ३५१ (२) २०२३ प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

# जिल्हास्तरीय विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत...

## लोणार पंचायत समिती मधील युवराज जाधव जिल्ह्यात प्रथम

**जनसंचलन/ लोणार**

जि प बुलढाणा येथे झालेल्या दिनांक ३/२/२०२५रोजी विद्यार्थी क्रीडा स्पर्धेत १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा गोत्रा येथील वरिष्ठ गटामधून युवराज विजय जाधव धावण्याच्या शर्यतीत बुलढाणा जिल्ह्यातून प्रथम आल्याने त्याचे कौतुक होत आहे तसेच मुलीचा कबड्डी गटातून तालुकास्तरीय प्रथम क्रमांक धावण्याच्या शर्यतीत क्रीडा स्पर्धेत तालुकास्तरीय घवघवीत यश जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा गोत्रा यांनी मिळून दिले याप्रसंगी शिक्षण क्षेत्रातील आदर्श प्रामाणिक कार्य करणारे माननीय गटशिक्षणाधिकारी साहेब जंगल सिंग अमरसिंग राठोड यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले तसेच सामाजिक कार्य क्षेत्रात आवड असणारे प्रामाणिक व्यक्तिमत्व मा जिल्हा परिषद सदस्य भगवानराव कोकाटे तथा कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य यांनी वेळोवेळी मुलांना आत्मबळ वाढवून त्यांना खेळाचे महत्व आणि शाळेला आवश्यक असणाऱ्या सुविधा पुरवून दिल्या त्यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले क्रीडा क्षेत्रातील जाणकार शिक्षक अमोल मोरे सर तसेच हमायू मोरे सर तसेच गायकवाड मॅडम यांनी मोलाचे परिश्रम करून मुलांचे आत्मबळ वाढवले तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोत्रा येथील शिक्षक शेळके सर पिके मोरे सर संपत जाधव सर शामराव उमाटे सर यांचे मुलांना सहकार्य व मार्गदर्शन मिळाले सर्व शिक्षक बंधू व भगिनी जि प शाळा गोत्रा मुख्याध्यापक यांच्याकडून सहकार्य मिळाले आहे

# पत्रकारांनी हा लाभ घ्यावा! बुलढाणा तहसीलदारांचे आवाहन!

**जनसंचलन/बुलढाणा**



तालुक्यातील पत्रकार किंवा पत्रकारांच्या कुटुंबातील सदस्य शेतकरी असतील तर त्यांनी जवळच्या सीएससी केंद्रात जाऊन आपला फॉर्मर आयडी नोंदवावा तसेच आयुष्यमान भारत योजनेचे हेल्थ इन्शुरन्स सुद्धा नोंदवून घ्यावे,असे आवाहन बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी केले आहे. सरकारी योजनांसाठी आता शेतकऱ्यांना फार्मर युनिक आयडी ॲग्री स्टॅक बनवणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या नवीन नियमाप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याने ॲग्री स्टॅक प्रोग्राम अंतर्गत आपले शेतजमीन आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे.अन्यथा शेतकऱ्यांना पीएम किसान, पीक विमा आणि अन्य कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता येणार नाही.त्यामुळे फार्मर युनिक आयडी आवश्यक आहे. शिवाय आयुष्मान भारत योजनेचे हेल्थ इन्शुरन्स नोंदवून लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार यांनी केले आहे.

# विहिरित पडलेल्या ५ घोणस जातीच्या सापांना सर्पमित्रांनी दिले जीवदान!

**जनसंचलन/लोणी बु**



तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथील श्री गणेश पोतरे यांच्या शेतातील विहीरीत एक महिन्यापासून पडलेल्या ३ घोणस जातीच्या सापांना सकाळी दहा वाजता बाहेर काढून मोहजा बंदी येथील जंगलात सोडून दिले. तसेच दुपारी एक वाजता श्री अरुण पोफळे राहणार हिरडव तालुका लोणार जिल्हा बुलढाणा यांच्या शेतातील विहीरीत आठ दिवसांपासून पडलेल्या २ घोणस जातीच्या सापांना सुरक्षित बाहेर काढून सापांबद्दलची संपूर्ण माहिती दिली, सर्पदंश कसे टाळता येतील तसेच सर्प दंश झाल्यावर काय करावे याबद्दल मार्गदर्शन केले आणि सापांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडून दिले, यावेळी सापांना बाहेर काढण्यासाठी सर्पमित्र कमलेश आगरकर आणि ऋषिकेश घोटुळकर यांनी सहकार्य केले. कुठेही साप दिसून आल्यास घाबरून जाऊन त्याला न मारता सर्पमित्रांना बोलावून त्याला जीवदान द्या असे आवाहन सर्पमित्र विनय कुलकर्णी यांनी केले.




# माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे कॉपी मुक्त अभियान...

## मार्गदर्शक सूचनाचे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचेमार्फत इयत्ता बारावीची परिक्षा दि. ११ फेब्रुवारी तर इयत्ता दहावीची परीक्षा दि. २१ फेब्रुवारीपासून सूरु होत आहे. जिल्ह्यात परीक्षाचे संचालन योग्य प्रकारे व्हावे व परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी जिल्ह्यात कॉपी मुक्त अभियानफ राबविण्यात येत असून मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहिर केले आहे. या सूचनाचे पालन करण्याचे आवाहन दक्षता समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. मार्गदर्शक सूचना यप्रमाणे : परीक्षा केंद्र परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. परीक्षा केंद्रांच्या ५० मीटर परीसरातील कॉम्प्युटर सेंटर, झेरॉक्स सेंटर, मोबाईल सेंटर परीक्षा सुरु होण्यापूर्वी दोन तास आधी पासुन परीक्षा संपेपर्यंत बंद ठेवण्यात यावे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उपलब्ध असून चित्रीकरणाची साठवणूक होत असल्याची खातरजमा करावी. कॉपी मुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख यांनी परीक्षा केंद्रांस भेट देण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. जिल्ह्यामध्ये एकूण १६ परिरक्षक केंद्र आहेत. सर्व परिरक्षक केंद्रावर सी.सी.टी.व्ही. कार्यन्वित आहे. तसेच परिरक्षक केंद्रावरून पेपर घेतल्याची वेळ व पेपर जमा करण्याची वेळ याबाबत सी.सी.टी. व्ही. द्वारे नजर ठेवण्याचे सूचित केले आहे. परिरक्षक केंद्रावरून पेपर घेऊन जाणे आणि जमा करण्यासाठी ज्या संस्थेचे किंवा शाळेचे परीक्षा केंद्र आहे. त्या शाळेच्या संस्था प्रमुख, शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्या मार्फत नियुक्त असलेला रनर शिक्षक यांनी चारचाकी वाहनाचा वापर करण्यासाठी आदेशित केले आहे. कॉपीमुक्त मोहिम यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यामध्ये आठ भरारी पथक तयार करण्यात आले आहे. इयत्ता बारावी परीक्षेसाठी जिल्ह्यामध्ये ११६ परीक्षा केंद्र असून परीक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थी संख्या ३४ हजार ६३५ आहे. तसेच इयत्ता दहावी परीक्षेसाठी जिल्ह्यामध्ये एकूण १५९ परीक्षा केंद्र असून परीक्षार्थी संख्या ४० हजार १९४ आहे. प्रत्येक परीक्षा केंद्रावर महसूल विभागाची बैठे पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. बैठे पथक परीक्षा सुरु होण्यापूर्वी परीक्षा केंद्रावर किमान एक तास अगोदर तसेच परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका परिरक्षण केंद्रावर उपस्थित राहील. परीक्षेशी संबंधित घटकांनी नियमबाह्य पद्धतीने मोबाईल अथवा इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर परीक्षा केंद्रावर होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार आहे. परीक्षा कॉपीमुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. परीक्षेत गैरप्रकारांना वाव मिळाल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊन शैक्षणिक दर्जा खालाऊ शकतो. त्यामुळे भावी पिढी सक्षम होणार नाही आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी व टिकविण्यासाठी सदर परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त, तणावमुक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी परीक्षा संबधित अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांनी पारदर्शकपणे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# विनायक पुढे कैलास ठेंगणे! वानरलिंगी सुळक्याला ४०० फूट रॅपलिंगने गवसणी!

**जनसंचलन/बुलढाणा**

अवघ्या ५ वर्षाच्या विनायक ने दोन वर्षांपूर्वी कळसूबाई शिखर अडीच तासात सर करून बुलढाण्याचा नावलौकिक वाढवला होता. त्याच विनायक ने आज वयाच्या सातव्या वर्षात वानरलिंगी सुळक्यावर ४०० फूट रॅपलिंग केले त्याच्या हा थरार अनेकांना थक्क करणारा आहे. बुलढाणा शहरातील ७ वर्षाच्या विनायक प्रतिभा प्रशांत राऊत ने दोन दिवसात त्याच्या वयोमानानुसार ३ विक्रमच रचले आहेत. पहिले, अवघ्या ७ वर्षात १६४६ मिटर उंची असलेले कळसूबाई शिखर दोनदा सर केले. दुसरे, चढाई साठी खडतर असलेला जिवधन किल्ला ते ३५० फूट अंतरावर असलेल्या वानरलिंगी सुळक्याचे शिखर आणि यादरम्यान असलेली ४००० फूट खोल जीवघेणी दरी चिमुकल्या ने झिप लाईन द्वारे पार करून एक विक्रमच केला आहे. तिसरी गोष्ट म्हणजे दूसऱ्या वर्गात शिकत असलेल्या विनायक ने जुन्नर तालुक्यातील वानरलिंगी सुळक्यावरून ४०० फूट रॅपलिंग करून बुलढाण्याचा नावलौकिक वाढवला आहे.सहकार विद्या मंदिर चा विद्यार्थी असलेल्या विनायक ने वरील तीन ही गोष्टी दोनच दिवसात पूर्ण करून त्याच्या खडतर मेहनतीचे व प्रचंड उर्जेचे आदर्श उदाहरणच त्याच्या वयातील इतर मुलांसमोर उभे केले आहे. विनायक ने या सर्व गोष्टींचे श्रेय त्याच्या पालकांना दिले आहे. वन्यजीव सोयरे च्या विविध उपक्रमात चिमुकल्या विनायक चा सक्रिय सहभाग असतो. त्याच्या पुढच्या वाटचाली ला हॅलो बुलढाणा टिम कडून शुभेच्छा व अभिनंदन !

